# जनसंपर्क विभाग

जळगाव १६ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्या वतीने घेण्यात आलेल्या परिसर मुलाखतीमध्ये जैवशास्त्र प्रशाळेतील एम.एस्सी. (मायक्रोबॉयोलॉजी, बायोटेक्नॉलॉजी आणि बायोकेमिस्ट्री) ह्या विषयांच्या आठ विद्यार्थ्यांची मुंबई येथील ल्यूपीन लि. या कंपनीत निवड झाली आहे.

या परिसर मुलाखतीसाठी विद्यापीठात प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या त्यात विद्यापीठाच्या जैवशास्त्र प्रशाळेतील प्रथमेश खंडारे, पंकज वाणी, योगेश बाविस्कर, प्रतिक शिंपी, प्रतिम उईके, हर्षवर्धन दाभाडे, वैष्णवी पाटील आणि दिपीका पाटील या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे समन्वयक प्रा. रमेश सरदार, उपसमन्वयक डॉ. उज्वल पाटील, प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी मुलाखतीचे व्यवस्थापन केले. कंपनीचे व्यवस्थापक श्रीरंग कानडे यांनी मुलाखती घेतल्या. यावेळी जैवशास्त्र प्रशाळेचे विभाग प्रमुख प्रा. भुषण चौधरी व जैवशास्त्र प्रशाळेचे प्लेसमेंट समन्वयक डॉ. नवीन दंदी उपस्थित होते. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, जैवशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. अरूण इंगळे यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**बातमी नं. २**

जळगाव १६ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन विस्तार सेवा विभागाच्या वतीने विदेशी भाषा व इतर प्रमाणपत्र शिक्षणक्रमासाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु होत आहे.

दि. २० मे पासून विविध प्रमाणपत्र शिक्षणक्रमांची ऑनलाईन प्रवेश प्रकिया सुरु होत आहे. त्यामध्ये जर्मन, जपानी, जर्मन भाष A-1 व A-2 स्तर, संस्कृत मोडी लिपी, तसेच सायबर गुन्हे आणि कायदे, मानसशास्त्रीय कसोट्या आणि मोजमाप, संशोधन प्रस्ताव लेखन, संशोधन अहवाल आणि पेपर लेखन प्रमाणत्र शिक्षणक्रमांचा समावेश आहे. हे सर्व शिक्षणक्रम ऑनलाईन पध्दतीने आठवड्यातून दोन दिवस पूर्ण करता येतील अधिक माहितीसाठी (https://nmu.ac.in/external-education/en-us/Programmes/certificate–programe ) या संकेतस्तळावर अथवा 0257-2257495/496 या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन विभागाचे संचालक प्रा. आशुतोष पाटील यांनी केले आहे.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १६ मे, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी